# मराठी भाषा पंधरवडा अहवाल

**कालावधी : १४ जानेवारी २०२६ ते २८ जानेवारी २०२६**
**स्थळ : औद्योगिक शिक्षण मंडळाचे इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल स्टडीज, पिंपरी**

## प्रस्तावना

मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती महाराष्ट्राच्या संस्कृतीची, परंपरेची आणि अस्मितेची जिवंत ओळख आहे. संत साहित्य, लोककला, नाटक, काव्य, इतिहास आणि सामाजिक चळवळींच्या माध्यमातून मराठी भाषेने समाजजीवन समृद्ध केले आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या आणि इंग्रजीप्रधान वातावरणाच्या युगात मातृभाषेचे जतन, संवर्धन आणि दैनंदिन वापर यांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगावा, तिचा अभ्यास करावा आणि अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम म्हणून मराठीचा वापर वाढवावा ही काळाची गरज आहे.

याच जाणीवेतून महाविद्यालयात दिनांक **१४ जानेवारी २०२६ ते २८ जानेवारी २०२६** या कालावधीत **"मराठी भाषा पंधरवडा"** मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या भाषिक, साहित्यिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक क्षमतांचा विकास व्हावा यासाठी विविध स्पर्धा, सादरीकरणे आणि संवादात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कविता, नाटक, वादविवाद, वक्तृत्व, लेखन आणि भाषिक अचूकतेवर आधारित स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना स्वतःची प्रतिभा सादर करण्याची संधी मिळाली.

या पंधरवड्याचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता निर्माण करणे, भाषेच्या समृद्ध परंपरेची ओळख करून देणे आणि आधुनिक काळातही मराठी भाषा प्रभावीपणे वापरण्याची प्रेरणा देणे हा होता. शिक्षकांचे मार्गदर्शन, संयोजकांचे नियोजन आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा पंधरवडा अत्यंत शिस्तबद्ध, ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## उद्दिष्टे

- मराठी भाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणे
- भाषिक व साहित्यिक कौशल्यांचा विकास करणे
- विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व सादरीकरण कौशल्य वाढवणे
- मराठी भाषेचा दैनंदिन व शैक्षणिक वापर प्रोत्साहित करणे
- सर्जनशीलता व तर्कशक्तीला चालना देणे

## सविस्तर अहवाल

### १) स्नेहल मोहिते मॅडम व गणेश पवार यांच्या समन्वयाखालील उपक्रम

या पंधरवड्यातील साहित्यिक आणि भाषिक उपक्रमांचे नियोजन व समन्वय स्नेहल मोहिते मॅडम आणि गणेश पवार यांनी उत्कृष्टरीत्या केले. विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी स्पर्धांचे स्वरूप ज्ञानवर्धक तसेच रंजक ठेवण्यात आले. प्रत्येक उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांसोबत सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि सादरीकरण क्षमता विकसित होण्यास मदत झाली.

**अंताक्षरी स्पर्धा**

या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी मराठी गीते, अभंग, भावगीते आणि कवितांच्या ओळींवर आधारित अंताक्षरी खेळली. प्रत्येक गटाला दिलेल्या अक्षरावरून योग्य गाणे किंवा कविता आठवून सादर करावी लागत होती. यामुळे विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, तत्पर विचारशक्ती आणि मराठी साहित्यावरील ज्ञान यांची चाचणी झाली. स्पर्धा अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडली. मनोरंजनासोबतच भाषेची गोडी वाढवण्याचे काम या उपक्रमाने केले.

**सहभागी : MBA प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्ष विद्यार्थी**
**विजेता : MBA I वर्ष**

**शुद्धलेखन स्पर्धा** मराठी भाषेतील शब्दलेखनाची अचूकता आणि व्याकरणातील शुद्धता तपासण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना परिच्छेद व स्वतंत्र शब्द देण्यात आले आणि त्यांचे योग्य लेखन अपेक्षित होते. मात्रा, जोडाक्षरे, उच्चारानुसार लेखन आणि विरामचिन्हांचा योग्य वापर यावर विशेष भर देण्यात आला. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना भाषेतील सूक्ष्म बाबींची जाणीव झाली आणि लेखनातील शिस्त वाढली.

**विजेता : धनश्री अजय श्रीगोंदेकर**
**उपविजेता : पायल कुंडलिक सावंत**

**घोषवाक्य स्पर्धा** या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक विषयांवर लघुरूप, प्रभावी आणि अर्थपूर्ण घोषवाक्ये तयार केली. कमी शब्दांत प्रभावी संदेश देण्याचे कौशल्य या उपक्रमातून विकसित झाले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून समाजजागृतीचे विविध संदेश समोर आले. घोषवाक्ये विचारप्रवर्तक आणि प्रेरणादायी होती.

**विजेता : सोहम सोनार**
**उपविजेता : कार्तिक कोथे**

**कविता लेखन स्पर्धा** विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, वैयक्तिक, निसर्ग आणि भावनिक विषयांवर स्वतःच्या भावना व विचार कवितेच्या रूपात व्यक्त केले. शब्दसौंदर्य, कल्पनाशक्ती आणि साहित्यिक शैली यांचा उत्तम संगम या कवितांमध्ये दिसून आला. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता आणि साहित्यिक अभिव्यक्तीला चालना मिळाली.

**विजेता : प्राची जाधव**
**उपविजेता : हर्षिका परदेशी**

**कविता वाचन स्पर्धा** या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या किंवा प्रसिद्ध कवींच्या कविता स्वर, लय, भाव आणि आत्मविश्वासाने सादर केल्या. उच्चारांची स्पष्टता, भावपूर्णता आणि सादरीकरण कौशल्य यांचे मूल्यांकन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्यात सुधारणा झाली आणि सार्वजनिक सादरीकरणातील आत्मविश्वास वाढला.

**विजेता : गीतांजली शिंदे**
**उपविजेता : श्रेया शिरसाठ**

**२) नजमुल हुडा सर व पूजा सोनवणे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखालील उपक्रम**

मराठी भाषा दिवसाच्या निमित्ताने नजमुल हुडा सर व पूजा सोनवणे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध साहित्यिक व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमधील अभिव्यक्ती कौशल्य, रंगकला, कल्पकता आणि मराठी भाषेचा प्रभावी वापर वाढवणे हा होता. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला आणि प्रत्येक स्पर्धेत आपली कला प्रभावीपणे सादर केली.

**कथाकथन स्पर्धा** या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी निवडक मराठी कथा प्रेक्षकांसमोर जिवंतपणे सादर केल्या. कथेमधील आशय, पात्रांचे भावविश्व, प्रसंगांचे वर्णन आणि आवाजातील चढ-उतार यांचा उत्कृष्ट वापर विद्यार्थ्यांनी केला. कथाकथन करताना चेहऱ्यावरील भाव, हातवारे आणि सादरीकरणातील आत्मविश्वास यावर विशेष लक्ष देण्यात आले. काही विद्यार्थ्यांनी कथांमधील नैतिक संदेश प्रभावीपणे मांडत प्रेक्षकांची मने जिंकली. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, भाषिक प्रवाहीपणा आणि सादरीकरण कौशल्य अधिक वृद्धिंगत झाले.

**विजेती : गीतांजली शिंदे**
त्यांनी सादर केलेली कथा भावपूर्ण शैलीत आणि स्पष्ट उच्चारांसह मांडल्यामुळे परीक्षकांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

**एकांकिका स्पर्धा** या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक व आधुनिक जीवनाशी संबंधित विषयांवर आधारित लघुनाट्यांचे सादरीकरण केले. संवादफेक, अभिनय, प्रसंगांची मांडणी, पोशाख आणि रंगमंचावरील हालचाली यांचा सुंदर समन्वय दिसून आला. एकांकिकांमधून समाजातील समस्या, तंत्रज्ञानाचा प्रभाव, कुटुंबव्यवस्था आणि युवकांच्या भावना यांचे वास्तवदर्शी चित्रण करण्यात आले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण आणि रंगकलेविषयीची आवड वाढली.

**विजेती : प्राची जाधव** त्यांच्या सादरीकरणात विषयाची मांडणी, अभिनयातील नैसर्गिकता आणि प्रभावी संवादफेक विशेष उठून दिसली.

**मराठी नाटक स्पर्धा** या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी समूहाने पूर्ण नाट्यप्रयोग सादर केला. कथानक, अभिनय, संवाद, रंगमंच सजावट आणि वेळेचे नियोजन यांचा उत्कृष्ट मेळ साधण्यात आला. प्रत्येक सदस्याने आपापली भूमिका आत्मविश्वासाने पार पाडली. नाटकांमधून मनोरंजनासोबत सामाजिक संदेशही देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलात्मक क्षमतांना वाव मिळाला तसेच रंगभूमीवरील भीती कमी होऊन सार्वजनिक सादरीकरणातील आत्मविश्वास वाढला.

**विजेता : गोविंद व संघ ("क्रिकेट टीम")**
या नाटकाने विनोद, संवाद आणि संघभावना यांच्या माध्यमातून प्रेक्षकांची मने जिंकली.

**३) हरिदिनी भागवत मॅडम व रविराज धाने यांच्या समन्वयाखालील उपक्रम**

मराठी भाषा पंधरवड्याच्या अंतर्गत हरिदिनी भागवत मॅडम व रविराज धाने यांच्या समन्वयाखाली बौद्धिक, भाषिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणाऱ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये तर्कशक्ती, आत्मविश्वास, स्पष्ट अभिव्यक्ती आणि लेखनशिस्त विकसित करणे हा होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आणि प्रत्येक स्पर्धा अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

**मराठी वादविवाद स्पर्धा** या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवर बाजू व विरोध अशा दोन्ही भूमिका सादर केल्या. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या मुद्द्यांना आधार देण्यासाठी उदाहरणे, तर्कशुद्ध मांडणी आणि समर्पक भाषा यांचा प्रभावी वापर केला. विषयाचे सखोल आकलन, मुद्देसूद विचार, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि श्रोत्यांशी साधलेला संवाद हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. विद्यार्थ्यांनी केवळ आपले मत मांडले नाही तर प्रतिस्पर्ध्यांच्या मुद्द्यांना उत्तर देत विवेकी विचारसरणीचे प्रदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची विश्लेषण क्षमता, बौद्धिक परिपक्वता आणि मराठी भाषेतील प्रभावी संवादकौशल्य अधिक विकसित झाले. स्पर्धा अत्यंत ज्ञानवर्धक आणि विचारप्रवर्तक ठरली.

**मराठी वक्तृत्व स्पर्धा** या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित विविध विषयांवर भाषणे सादर केली. स्पष्ट उच्चार, योग्य शब्दांची निवड, आवाजातील ठामपणा आणि सादरीकरणातील आत्मविश्वास यामुळे प्रत्येक वक्त्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांमधून विषयाचे विविध पैलू उलगडून दाखवले तसेच प्रभावी उदाहरणे देत विचार मांडले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सार्वजनिक बोलण्याच्या भीतीत घट झाली आणि आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली.

**प्रथम : प्राची जाधव** – आत्मविश्वासपूर्ण व प्रभावी मांडणीमुळे प्रथम क्रमांक.
**द्वितीय : सोहम सोनार** – स्पष्ट अभिव्यक्ती व संतुलित विचारांमुळे द्वितीय क्रमांक.

**हस्ताक्षर स्पर्धा** विद्यार्थ्यांना दिलेला मराठी परिच्छेद अचूक, स्वच्छ आणि नीटनेटके हस्ताक्षरात लिहिण्याचे आव्हान देण्यात आले. अक्षरांची रचना, अंतर, ओळींची सरळता, स्वच्छता आणि वाचनीयता या निकषांवर

मूल्यांकन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी अत्यंत काळजीपूर्वक लेखन केले, ज्यामुळे त्यांच्या लेखनशिस्तीचा आणि एकाग्रतेचा प्रत्यय आला. या स्पर्धेमुळे सुंदर हस्ताक्षराची सवय, स्वच्छतेची जाणीव आणि लेखनातील शिस्त विकसित होण्यास मदत झाली.

**प्रथम : श्रेया नवनाथ शिरसाठ**
**द्वितीय : निलोफर खान**

**४) प्रा. इशा भाटे आणि डॉ. मयूर साळी यांच्या समन्वयाखालील उपक्रम – मराठी शब्दकोड**

मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त मराठी शब्दकोड हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी गोडी निर्माण करणे तसेच त्यांचे शब्दज्ञान, वाचनकौशल्य आणि विचारशक्ती विकसित करणे हा होता.

उपक्रमाची रूपरेषा विद्यार्थ्यांना व्हॉट्सअपद्वारे पूर्वीच कळविण्यात आली होती. हा उपक्रम दिनांक २७/०१/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता प्रथम वर्षाच्या वर्गामध्ये घेण्यात आला. या उपक्रमामध्ये एकूण १६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या उपक्रमामध्ये मराठी भाषा व साहित्य, कवी-लेखक, महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल, नद्या, किल्ले, पदार्थ तसेच दैनंदिन जीवनातील शब्दांचा समावेश करण्यात आला होता. एकूण ३० प्रश्न विचारण्यात आले होते आणि उपक्रमासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात आला होता. मुलांना शब्द कोंड्याच्या प्रति वाटण्यात आल्या. १५ मिनिट दिली आणि १५ मिनिटांनी विद्यार्थ्यां कडून प्रति जमा करण्यात आल्या. परीक्षकांनी उत्तर तपासून विजेत्यांची नाव घोषित केली.

स्पर्धेच्या निकालानुसार कु. ऐश्वर्या परमार यांना विजेता तर कु. साक्षी हुमाणे यांना उपविजेता घोषित करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. इशा भाटे आणि डॉ. मयूर साळी यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. स्नेहल मोहिते आणि प्रा. पूजा सोनावणे यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला असून उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. अहवाला सोबत विचारलेले प्रश्न, मुलांची हजेरी पत्रिका आणि त्यांनी सोडवलेल्या कोड्यांच्या प्रति जोडत आहोत.

**मराठी प्रश्नमंजुषा उपक्रम अहवाल** मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त प्रश्नमंजुषा हा उपक्रम दोन टप्प्यांत राबविण्यात आला. पहिला टप्पा १६ जानेवारी रोजी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला असून त्याची लिंक २४ तास खुली ठेवण्यात आली होती. दुसरा टप्पा २७ जानेवारी रोजी ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आला.

या उपक्रमामध्ये एकूण ८ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेमध्ये तीन फेऱ्यांचा समावेश होता. प्रश्नांमध्ये मराठी भाषेविषयी ज्ञान, शब्दसंपदा, बोलीभाषा, म्हणी, काव्यपंक्ती, चित्र ओळख व त्यावर आधारित सामाजिक संदेश तसेच महाराष्ट्राशी संबंधित प्रश्न विचारण्यात आले. विजेता संघ आकांशा गाडेकर आणि दीक्षांत वाकपंजर तर उपविजेता संघ पूजा सोनावणे आणि आस्था माने . स्पर्धेचे आयोजन प्रा. इशा भाटे आणि डॉ. मयूर साळी यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. नजमुल हुडा यांनी केले

**उपक्रम - चारोळी लेखन** या उपक्रमात उपक्रमाचे समन्वयक प्रा. इशा भाटे आणि डॉ. मयूर साळी यांनी विद्यर्थ्यांना पूर्व सूचना दिल्या होत्या. विद्यर्थ्यांना कुठल्याही विषयावर स्वलिखित चारोळी देण्यासाठी सांगितले होते. आलेल्या चारोळींमधून २ उत्कृष्ट चारोळी निवडण्यात आल्या. तरळेकर प्रथमेश विजेता आणि हर्षिका परदेशी उपविजेते म्हणून घोषित करण्यात आले. आलेल्या चारोळ्या अहवालासोबत जोडण्यात येत आहे

## ५) डॉ. विकास बरबटे यांच्या मार्गदर्शनाखाली – मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम

मराठी भाषा ही महाराष्ट्राची अस्मिता, संस्कृती आणि ओळख आहे. या जाणिवेतून इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल स्टडीज (IPS) येथे दिनांक 27 जानेवारी 2026 रोजी *मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम* आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मराठी भाषेचे महत्व अधोरेखित करणे, तिच्या जतन व संवर्धनाबाबत जागृती निर्माण करणे हा होता. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सुधाकर बोकेफोडे, संचालक, IPS and डॉ. ललित कानोरे, प्राचार्य, CSIT यांची उपस्थिती लाभली. शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**संवाद सत्र व चर्चेचे मुद्दे** : कार्यक्रमामध्ये *संवादात्मक प्रश्नोत्तर सत्र* आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी मराठी भाषेच्या महत्वाबाबत, आजच्या इंग्रजीप्रधान वातावरणातील आव्हाने, तसेच मराठी भाषेच्या संरक्षणासाठी कायदा करण्याची आवश्यकता आहे का? अशा विविध प्रश्नांची विचारणा केली.

डॉ. सुधाकर बोकेफोडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण व दूरदृष्टीपूर्ण उत्तरे देत सांगितले की,मराठी भाषा ही केवळ संवादाची साधन नसून ती आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे. भाषेचे संरक्षण केवळ कायद्याने होऊ शकत नाही; त्यासाठी समाजात जागृती, अभिमान आणि दैनंदिन वापर आवश्यक आहे. शिक्षणसंस्थांनी मराठी भाषेचा शैक्षणिक, सांस्कृतिक व संशोधन क्षेत्रात सक्रिय वापर केला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

डॉ. ललित कानोरे यांनी संतुलित दृष्टिकोन मांडताना सांगितले की, कायद्याची भूमिका सहाय्यक असू शकते; मात्र मराठी भाषेचे खरे सामर्थ्य तिच्या उपयुक्ततेत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल माध्यमे आणि व्यावसायिक शिक्षण यांच्याशी मराठी भाषा जोडली गेली तर ती अधिक प्रभावीपणे पुढील पिढीपर्यंत पोहोचू शकते.

कायद्याच्या संदर्भातील चर्चा: दोन्ही मान्यवरांनी यावर एकमताने सांगितले की, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कायदा आवश्यक असू शकतो; परंतु समाजाची मानसिकता, शैक्षणिक प्रोत्साहन आणि स्वयंस्फूर्त वापर हे घटक अधिक प्रभावी ठरतात. तरुण पिढीने मराठी भाषेचा अभिमान बाळगणे हीच खरी संरक्षणाची दिशा आहे.

समारोप : कार्यक्रमाचा समारोप प्रेरणादायी वातावरणात झाला. डॉ. सुधाकर बोकेफोडे व डॉ. ललित कानोरे यांनी दिलेल्या स्मार्ट, विचारप्रवर्तक आणि अभ्यासपूर्ण उत्तरांमुळे उपस्थितांना मराठी भाषेबाबत नव्या दृष्टीने विचार करण्याची प्रेरणा मिळाली.

**छायाचित्रे:**







GPS Map Camera
Pune, Maharashtra, India
1+2a, Cts No. 4695, Wing-b, S. No. 29, Old Mumbai Rd, Opposite Central Mall, Midc, Pimpri Colony, Pune, Maharashtra 411018, India
Lat 18.632172° Long 73.799575°
22/01/26 03:57 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Pune, Maharashtra, India
S. No. 29, Old Mumbai Rd, Opposite Central Mall, Midc, Pimpri Colony, Pune, Maharashtra 411018, India
Lat 18.63227° Long 73.799525°
23/01/26 01:41 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Pune, Maharashtra, India
1+2a, Cts No. 4695, Wing-b, S. No. 29, Old Mumbai Rd, Opposite Central Mall, Midc, Pimpri Colony, Pune, Maharashtra 411018, India
Lat 18.632032° Long 73.799777°
23/01/26 01:43 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Pimpri-chinchwad, Maharashtra, India
Jrj2+x27, Old Mumbai - Pune Hwy, Midc, Pimpri Colony, Pimpri-chinchwad, Maharashtra 411018, India
Lat 18.632397° Long 73.799945°
23/01/26 01:25 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Pune, Maharashtra, India
S. No. 29, Old Mumbai Rd, Opposite Central Mall, Midc, Pimpri Colony, Pune, Maharashtra 411018, India
Lat 18.632282° Long 73.799797°
23/01/26 01:20 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Pune, Maharashtra, India
S. No. 29, Old Mumbai Rd, Opposite Central Mall, Midc, Pimpri Colony, Pune, Maharashtra 411018, India
Lat 18.632173° Long 73.79959°
23/01/26 01:18 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Pune, Maharashtra, India
1+2a, Cts No. 4695, Wing-b, S. No. 29, Old Mumbai Rd, Opposite Central Mall, Midc, Pimpri Colony, Pune, Maharashtra 411018, India
Lat 18.632035° Long 73.799763°
23/01/26 01:35 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Pimpri-chinchwad, Maharashtra, India
Gandhi Peace Centre, Service Rd, Midc, Pimpri Colony, Pimpri-chinchwad, Maharashtra 411018, India
Lat 18.631673° Long 73.799072°
23/01/26 12:58 PM GMT +05:30
Google

Audyogik Shikshan Mandal's
(Society Regd. No. Maharashtra/1330/Pune 83; Public Trust No. F-2451/Pune 83)

# INSTITUTE OF PROFESSIONAL STUDIES (IPS)

(Approved by AICTE, Govt. of India & affiliated to University of Pune)

AICTE CODE : 1-4240185 DTE CODE : MB6166 AISHE CODE : C-46639









**निष्कर्ष / परिणाम**

- विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल जागृती व अभिमान वाढला
- साहित्य, अभिनय, लेखन व वक्तृत्व कौशल्यांचा विकास झाला
- विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व सादरीकरण कौशल्य सुधारले
- मराठी भाषेचा शैक्षणिक व दैनंदिन वापर वाढवण्याची प्रेरणा मिळाली
- संपूर्ण पंधरवडा उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व यशस्वी ठरला

SUDHAKAR JANARDAN BOKEPHODE

Digitally signed by SUDHAKAR JANARDAN BOKEPHODE
Date: 2026.02.10 14:38:06 -08'00'